R.No. MHHMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४३

दि.२४ जानेवारी २०२६, वार :शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

## ‘पुणे ग्रँड टूर’मुळे पुण्याचे नाव जागतिक पातळीवर उपमुख्यमंत्री अजित पवार






पुणे: ‘पुणे ग्रँड टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन करत दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण केल्या असून, याबाबत केंद्र सरकारसह देश-विदेशातील सायकलपटूंनी समाधान व्यक्त केले आहे. या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचल्याचे प्रशंसोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री पवार आणि केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ‘पुणे ग्रँड टूर’च्या अंतिम टप्प्याला श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, क्रीडा व युवक सेवा आयुक्त शीतल तेली उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, आंतरराष्ट्रीय सायकलिंग संघटनेच्या (युसीआय) महासंचालक अमिना लानाया, आशियाई सायकलिंग महासंघाचे अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव दातो मनिंदर पाल सिंग, अभिनेता अमीर खान, बजाज ऑटोचे कर विभागाचे उपाध्यक्ष चेतन जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, बजाज पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. या स्पर्धेला शहर व ग्रामीण भागातील क्रीडारसिकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला असून, युवक, युवती, महिला, शेतकरी, विद्यार्थी आदी सर्व घटकांचा त्यात सहभाग दिसून आला. यापूर्वी पुण्यात झालेल्या स्पर्धेलाही पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.

आगामी ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील असून, क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि प्रतिभावंत खेळाडू घडावेत या उद्देशाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे उभारण्यात आले आहे. राज्यासह देशात अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत राहील, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या, ‘पुणे ग्रँड टूर’चे महाराष्ट्र सरकार व जिल्हा प्रशासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत-२०४७’ या संकल्पनेच्या पूर्ततेत क्रीडा क्षेत्राचा मोठा वाटा असणार असून, देश क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करताना दिसत आहे. क्रीडा क्षेत्राला ‘सॉफ्ट पॉवर’च्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. शासन व प्रायोजकांच्या सहकार्याने स्पर्धेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. जागतिक पातळीवरील खेळाडूंना एकत्र आणून क्रीडा पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आला असून, भारत क्रीडा पर्यटनाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

यावेळी अभिनेता अमीर खान यांनीही ‘पुणे ग्रँड टूर’च्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

दरम्यान, जर्मनीचे सायकलपटू बेंडकी बेकर यांना यावेळी मानवंदना (गार्ड ऑफ ऑनर) देण्यात आली. बेकर यांनी सलग २० वर्षे सायकलपटू म्हणून विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, या स्पर्धेनंतर ते सायकलिंगमधून निवृत्त होत आहेत.

## लातूर आणि लातूरकरांच्या हिताला प्राधान्य द्या माजी मंत्री आ. निलंगेकरांचे भाजप नगरसेवकांना आवाहन

लातूर/प्रतिनिधी:- लातूर महानगर पालिकेच्या निवडणूकीत विकासाचा मुद्दा घेऊन आपण जनतेसमोर गेलो होतो. मात्र काँग्रेसने नेहमीप्रमाने मतदारांची दिशाभुल करत भावनेचे राजकारण केले. परिणामी लातूरने आपल्याला कौल दिलेला नसला तरी लातूरच्या विकासाची भुमिका आगामी काळात निवडूण आलेल्या नगरसेवकांनी सभागृहात ठामपणे मांडावी अशी अपेक्षा व्यक्त करत लातूर आणि लातूरकरांच्या हिताला प्राधान्य द्यावे असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी भाजपच्या नवनिवार्चीत नगरसेवकांना केले.



### गटनेता निवडीचे अधिकार प्रदेशाकडे

भाजपच्या वतीने निवडूण आलेल्या नवनिवार्चीत २२ नगरसेवकांचा पुर्ण बायोडाटा पक्षाकडे असल्याचे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की, ज्या पद्धतीने उमेदवार निवडीचे अधिकार प्रदेशाकडे होते त्याच पद्धतीने आता गटनेता निवडीचा अधिकार सुद्धा प्रदेशाकडे असल्याचे सांगितले. त्यामुळे गटनेता कोण होईल हे सांगणे आता शक्य नाही. मात्र गटनेता निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्षाच्या सहीने लवकरच प्राप्त होईल असेही स्पष्ट केले.

लातूर शहर जिल्हा भाजप कार्यालयात नवनिवार्चीत नगरसेवकांची बैठक पार पडली. या प्रसंगी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून झालेली विकास कामे व आगामी काळात सरकारच्या मदतीने करण्यात येणारा लातूरचा विकास हिच भुमिका घेऊन आपण सर्वजण महानगरपालिका निवडणूकीला सामोरे गेलो होतो असे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की, काँग्रेसने याउलट मतदारांची दिशाभूल करत भावनेचे राजकारण केले. अखेर विकासावर भावनेचा विजय झाला असून या निवडणूकीत आपण जे यश मिळाविले आहे ते यश निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. आगामी काळात निवडूण आलेल्या २२ नगरसेवकांनी एकदिलाने व एकजुटीने सभागृहात काम करत लातूर आणि लातूरकरांच्या हिताला प्राधान्य द्यावे असे स्पष्ट केले. या २२ नगरसेवकांना संपूर्ण शहराचे प्रश्न सभागृहात मांडायचे असून सत्ताधाऱ्यांना वेळप्रसंगी जाब विचारण्याची भुमिकाही घ्यावी लागेल असे सांगितले. त्याचबरोबर सत्तेचे पहारेकरी आणि विकासाचे रखवलदार अशी भुमिका आगामी काळात पार पाडत पुढील विधानसभा निवडणूकीचा विजय हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवत आपण सर्वांनी काम करावे असे आवाहन आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी यावेळी केले. नगरसेवकांच्या पाठिशी आम्ही सर्वजण खंबीरपणे उभा राहू अशी ग्वाही देऊन लातूरच्या विकासासाठी आवश्वक असणारा निधी प्राप्त करून घेण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू असा विश्वासही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी यावेळी दिला.महापालिका निवडणूकीत उमेदवार असलेल्या प्रत्येकांने जीवाचे रान करत निवडणूकीला सामोरे गेले असल्याचे सांगत डॉ. अर्चना पाटील चाकूरकर म्हणाल्या की, ज्यांना यश मिळाले त्यांचेही आणि जे जिद्दीने लढले त्यांचेही अभिनंदन केले. आता निवडूण आलेल्या २२ नगरसेवकांच्या खांद्यावर ७० जणांचे ओझे असून या २२ जणांनी शहराच्या प्रत्येक भागातील समस्या आणि प्रश्न मार्गी लावण्यााठी सभागृहात खंबीरपणे ठोस भुमिका मांडावी अशी अपेक्षा व्यक्त केली. नगरसेवकांच्या पाठिशी आम्ही सर्वजन असलो तरी आपण आता लातूरच्या जनतेसाठी कायम सतर्क राहावे असे आवाहन डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी यावेळी केले.नवनिवार्चीत भाजपच्या २२ नगरसेवकांना आता लातूरकरांची भुमिका सभागृहात तर मांडायची आहेच मात्र त्यासोबत पक्षाची विचारधारा शहराच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याची भुमिका पार पाडावी लागणार असल्याचे सांगून शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, काँग्रेसने मतदारांची दिशाभूल करत हि निवडणूक जिंकलेली आहे आगामी काळात काँग्रेसचा हा खोटारडेपणा लातूरकरांसमोर आणण्याचे कामही नगरसेवकांच्या माध्यमातून पक्ष करेल असा विश्वास व्यक्त केला. या २२ नगरसेवकांनी पक्षाची भुमिका आणि पक्षाचे आदेश डोळ्यासमोर ठेऊनच वाटचाल करणे अपेक्षीत असून पक्षही पुर्ण ताकदीने नगरसेवकांच्या पाठिशी असेल अशी ग्वाही दिली. या बैठकीला शहर जिल्हा सरचिटणीस संजय गिर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रविण कस्तुरे यांच्यासह युवा मोचार्चे जिल्हाध्यक्ष ओम धरणे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शितल मालू आदींसह पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

### अभिनंदनाचा ठराव

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात घवघवीत यश प्राप्त करत भाजपाने प्रथम स्थान मिळवले आहे. तसेच राज्याचे महसुलमंत्री तथा निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांनी लातूर महानगरपालिका निवडणूकीत शहर भाजपाला मोठी ताकद दिली आणि वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. त्याच बरोबर लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी स्वत: उमेदवारी न घेता कार्यकर्त्यांना प्राधान्य देवून शहरभरात प्रचाराची धूरा समर्थपणे सांभाळली होती. याबद्दल शहर जिल्हा भाजपाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या अभिनंदनाचा ठराव यावेळी घेण्यात आला.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी अनुसूचित जाती जमाती आयोगाला निवेदन .



लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संवहटनेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली लातूर दौऱ्यावर असलेले अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांची भेट घेऊन लातूर जवाहर नवोदय विद्यालय येथील इयत्ता सहावीत शिकणाऱ्या अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी दोषींवर कठोरात कठोर कारवाई प्रस्तावित करण्याची मागणी करण्यात आली . यावेळी संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके संपर्क प्रमुख आनंद जाधव, ॲड रमक जोगदंड, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, अजहर शेख, पंकज शिंदे ,चंदू बगडे वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार, आकाश ढगे, आतिष कोंडेकर, वाजीद सय्यद , तबरेज शेख सह आदीजन उपस्थित होते .

## नवी मुंबईत तिसऱ्या क्रमांकाची झेप : वंचित बहुजन आघाडीची नवी सुरुवात

नवी मुंबई / के.एच. हनवते : - नवी मुंबई महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना विजय मिळवता आला नसला, तरी काही प्रभागांमध्ये तिसऱ्या क्रमांकापर्यंत मजल मारत पक्षाने आपली उपस्थिती ठळकपणे नोंदवली आहे. याआधी भारिप बहुजन महासंघाच्या कार्यकाळात महानगरपालिका निवडणुकांमध्ये तिसऱ्या क्रमांकापर्यंतही पोहोचता आले नव्हते. त्या पार्श्वभूमीवर सध्याची कामगिरी काही अंशी समाधानकारक मानली जात आहे.

आत्ताच झालेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ अ, ३ अ, ६ अ आणि २० अ या प्रभागांमध्ये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर पराभूत झाले. विजय दूर असला तरी या प्रभागांमध्ये मिळालेली मते आणि जनाधार भविष्यासाठी आशादायक संकेत देणारे ठरत आहेत.राजकीय विश्लेषकांच्या मते, नवी मुंबईसारख्या शहरी व बहुपक्षीय राजकारण असलेल्या शहरात वंचित बहुजन आघाडीने केलेली ही कामगिरी दुर्लक्षित करता येणार नाही. विशेषतः पक्षाचा संघटनात्मक विस्तार आणि स्थानिक पातळीवरील उपस्थिती लक्षात घेता ही निवडणूक एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे.

तथापि, पुढील काळात नवी मुंबईत प्रभावी पक्षसंघटन, सातत्यपूर्ण जनसंपर्क, स्थानिक प्रश्नांवर ठाम भूमिका आणि कार्यकर्त्यांचे जाळे अधिक मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने ही निवडणूक वंचित बहुजन आघाडीकरिता आत्मपरीक्षणाची आणि नव्या रणनीतीची संधी ठरू शकते. एकूणच, विजयापासून दूर असतानाही नवी मुंबई महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने आपली राजकीय उपस्थिती अधोरेखित केली असून, या कामगिरीची सूक्ष्म नोंद घेणे राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे ठरेल. संकलन :वसंत वाघमारे नवी मुंबई

## संपादकीय...

# मंदिरांपेक्षा वाचनालये अधिक व्हावीत

मंदिरांपेक्षा वाचनालये अधिक झाली पाहिजेत हा विचार प्रथमदर्शनी अनेकांना धक्का देणारा वाटू शकतो. काहींना तो धर्मविरोधी भासतो, तर काहींना परंपरांवर घाला घालणारा. मात्र हा विचार भावनिक नव्हे, तर वैचारिक पातळीवर समजून घेतला, तर तो समाजाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि काळाची गरज असलेला ठरतो. हा मुद्दा श्रद्धेविरोधी नसून अज्ञानविरोधी आहे; धर्माविरोधी नसून विवेकाच्या बाजूने उभा राहणारा आहे.

मंदिरे ही श्रद्धेची केंद्रे आहेत. त्यांनी हजारो वर्षे समाजाला मानसिक आधार दिला आहे. दुःखात दिलासा, संकटात धैर्य, आणि जीवनात नैतिक मूल्यांची जाणीव करून देण्याचे कार्य मंदिरांनी केले आहे. सांस्कृतिक परंपरा जपण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मंदिरांचे सामाजिक महत्त्व नाकारण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र प्रश्न असा आहे की, केवळ श्रद्धेच्या आधारावर समाज आधुनिक, सक्षम, विज्ञाननिष्ठ आणि लोकशाही मूल्यांशी निष्ठावान राहू शकतो का?

आजचा काळ हा ज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा आणि प्रचंड स्पर्धेचा आहे. माहितीचा विस्फोट झाला आहे, पण त्यातून योग्य-अयोग्य ओळखण्याची क्षमता कमी होत चालली आहे. सोशल मीडियावरून अफवा, द्वेष, अर्धसत्ये आणि भावनिक आवाहने क्षणात पसरतात. अशा परिस्थितीत समाजाला सर्वाधिक गरज आहे ती विवेकाची, चिकित्सक विचारांची आणि अभ्यासाची. ही गरज पूर्ण करण्याचे कार्य वाचनालये करतात.

वाचनालय म्हणजे केवळ पुस्तके ठेवण्याची जागा नाही. ते विचारांचे केंद्र असते, संवादाचे व्यासपीठ असते आणि लोकशाहीचे मौन मंदिर असते. येथे कोणताही गजर नसतो, पण माणसाच्या अंतर्मनात प्रश्नांची, विचारांची आणि बदलाची क्रांती घडते. वाचनामुळे माणूस केवळ माहिती गोळा करत नाही, तर तो विचार करायला शिकतो, भिन्न मतांचा आदर करायला शिकतो आणि स्वतःचे मत तर्काच्या आधारावर घडवतो.

आज आपल्या समाजात चित्र नेमके उलटे दिसते. अनेक गावांमध्ये, वॉर्डांमध्ये एकाहून अधिक मंदिरे आहेत; धार्मिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. पण त्याच ठिकाणी एकही सुसज्ज सार्वजनिक वाचनालय नसते. शाळा संपल्यानंतर अभ्यासासाठी शांत जागा नाही, स्पर्धा परीक्षांसाठी संदर्भग्रंथ उपलब्ध नाहीत, आणि प्रौढांसाठी विचारप्रवर्तक वाचनाची संधी नाही. याचा परिणाम म्हणजे भावनिकदृष्ट्या सक्रिय पण बौद्धिकदृष्ट्या दुर्बल समाज.

वाचनसंस्कृती कमी होत चालल्याने अंधश्रद्धा वाढते, प्रश्न विचारण्याची सवय कमी होते आणि अधिकार-कर्तव्यांची जाणीव बोथट होते. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती सतत जागरूक, विचारशील नागरिकांवर उभी असते. जर नागरिक वाचत नसतील, विचार करत नसतील, तर लोकशाही केवळ नावापुरती उरते.

याचा अर्थ असा नाही की मंदिरे नकोत किंवा श्रद्धेला स्थान नसावे. श्रद्धा माणसाला अंतर्गत बळ देते, तर विवेक माणसाला दिशा देतो. दोन्हींचा समतोल आवश्यक आहे. पण आजच्या काळात हा समतोल ढासळलेला दिसतो. श्रद्धेला अतिप्राधान्य मिळते, तर अभ्यास, संशोधन आणि विचारांना दुय्यम स्थान दिले जाते. परिणामी समाज भावनांवर चालतो, विचारांवर नाही.

आज गरज आहे ती या समतोलाला पुन्हा स्थिर करण्याची. प्रत्येक गावात, प्रत्येक नगरात किमान एक सुसज्ज वाचनालय असणे ही लक्झरी नव्हे, तर गरज आहे. सरकारने सार्वजनिक वाचनालयांसाठी स्वतंत्र धोरण, पुरेसा निधी आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था यांनी मिळून वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

नागरिकांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. देवळात देणगी देताना वाचनालयासाठी पुस्तकदान करणे, तरुणांना वाचनाची गोडी लावणे, चर्चा-संवादाचे कार्यक्रम आयोजित करणे अशा छोट्या प्रयत्नांतून मोठा बदल घडू शकतो. कारण विचार करणारा समाजच प्रगती करू शकतो.

देव माणसाला श्रद्धा देतो, पण पुस्तक माणसाला प्रश्न विचारायला शिकवते. श्रद्धा माणसाला शांत करते, पण विचार माणसाला सक्षम करतो. समाजाला केवळ शांतता नको, तर विवेक, सहिष्णुता आणि प्रगतीही हवी असेल, तर मंदिरांबरोबरच आणि आजच्या काळात निश्चितच अधिक प्रमाणात वाचनालये उभी राहिली पाहिजेत. हाच सुजाण, लोकशाहीवादी आणि प्रगत समाजाचा खरा मार्ग आहे.

# रायगडमधील खालापूर येथील बीड खुर्द गावातील तुलनेने अज्ञात लेणी



रायगड जिल्ह्यातील बीड खुर्द गावातील तुलनेने अज्ञात असलेल्या लेणी स्थापत्याचा अभ्यास करणे हा सदर लेखाचा उद्देश आहे. बीड खुर्द गावाशेजारी असलेल्या पूर्वेकडील टेकडीवर सदर लेणी आहेत. या प्रामुख्याने दोन स्वतंत्र लेणी रचना असून या लेखात दर्शविलेले लेणे क्रमांक एक हे विहार स्वरूपाचे लेणे असून, त्यात एक भिक्खू कक्ष; दोन शिलालेख; काही रॉक आर्ट आणि दोन अपूर्ण उत्खनने दिसून येतात. लेणे क्रमांक दोन ही मूळतः एक नैसर्गिक गुहा असून मानवनिर्मित लेणीत तिचे रूपांतर करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. स्थानिक लोक ज्यांना 'पांडव घळई' असे म्हणतात, अशा या लेणी स्थानिक लोकांशिवाय विद्वान जगताला माहित नाही.

बीड खुर्द हे बोरघाटाच्या उतारावर वसलेले एक छोटेसे गाव असून, ते रायगड जिल्ह्यातील उपजिल्हा मुख्यालय खालापूरपासून १३ किमी अंतरावर आणि जवळच्या मध्य रेल्वेच्या केळवली आणि डोळवली स्थानकापासून अंदाजे ३ किमी अंतरावर आहे. बोरघाट; ज्याला खंडाळा घाट असेही म्हणतात, हा महाराष्ट्राच्या पश्चिम घाटातील एक डोंगरी घाटमार्ग आहे. हा घाटमार्ग त्याच्या निसर्गरम्य सौंदर्यासाठी ओळखला जातो, ज्यामध्ये दऱ्या, धबधबे आणि टेकड्या आहेत, ज्यामुळे ते निसर्ग प्रेमी आणि ट्रेकर्ससाठी एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे. हा एक प्राचीन व्यापारी मार्ग होता, जो सातवाहन काळापासून कोकण किनारा (कल्याण, सोपारा सारख्या बंदरांसह) दख्खनच्या पठाराशी जोडण्यासाठी वापरला जात होता. आधुनिक काळातही, हा एक महत्त्वाचा वाहतूक मार्ग असून, जो सध्याच्या मुंबई आणि पुणे यांना रस्ते आणि रेल्वेमार्गाने जोडतो. या बोरघाट मार्गावर मोठ्या संख्येने बौद्ध लेणी असल्याचे दिसून येतात. ज्यामध्ये राजमाची किल्ल्याच्या पायथ्याशी कोंडाणे, आंबिवले, हाळ खुर्द, वर्णे तसेच जांबरुंग (जे आता गंभीरनाथाला समर्पित आहे) लेण्या बोरघाटाच्या खालील भागात असून त्या कर्जत-खालापूरपासून फक्त काही मैलांच्या अंतरावर आहेत. कोंडाणे लेण्या जिथे आहेत त्या जवळील कोंदिवडे गावासभोवताली असलेल्या डोंगराळ प्रदेशात अनेक लहान लेण्या आहेत. वरील माहितीच्या आधारे असे समजते की; बोरघाटचा संपूर्ण परिसर ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आणि पुरातत्वीय स्थळांनी समृद्ध आहे. तद्रूप, या लेण्यांचे विस्तृत तपशीलवार वर्णन खाली दिले आहे.

लेणी १ हे एक साधे विहार लेणे आहे. जे पश्चिमाभिमुख असून यात नैऋत्यमुखी एक भिक्खू कक्ष आहे (७ फूट लांब, ४.११ फूट रुंद आणि ६.५ फूट उंच). पूर्वी या भिक्खू कक्षास लाकडी दरवाजा (२ फूट रुंद) असावा, कारण त्याचे अवशेष खोबणीच्या स्वरूपात दारकसीच्या वरील आणि खालील बाजूस दिसून येतात. कक्षाच्या आत उजव्या बाजूला एक आसनपेढी म्हणजेच दगडी बाक (६.५ फूट लांब, २ फूट रुंद आणि १.५ फूट उंच) आहे, ज्याचा वापर येथे राहणारे भिक्खू बसण्यासाठी किंवा विश्रांती घेण्यासाठी करत असत. तसेच; आसनावर लहान गोलाकार छिद्रे दिसतात. भिक्खूकक्षाच्या आतील बाजूस जमिनीवर एक खोबणी आहे. प्रारंभिक बौद्ध लेणी स्थापत्यातील इतर सर्व विहार कक्षांना सपाट छत आहे. त्याचप्रमाणे; या विहार कक्षाला देखील सपाट छत आहे. भिक्खूकक्षाच्या बाहेरील बाजूस उजव्या भिंतीला जोडलेला एक लहान बाक (३ फूट लांब, १ फूट रुंद आणि जमिनीपासून २ फूट उंच) असून त्यास एक खोबणी आहे. त्याच उजव्या भिंतीवर, वरच्या बाजूला एक शिलालेख आहे आणि शिलालेखाच्या खालोखाल प्राण्यांच्या आकृत्यांचे काही रॉक आर्ट आहेत. भिक्खू कक्षाच्या उजव्या बाजूला दोन अपूर्ण उत्खनने दिसतात. त्यापैकी; मोठ्या उत्खननात वीट मातीचा स्तूप बांधलेला दिसून येतो. हा स्तूप मूळ लेणीचा भाग नसून ते बांधकाम मूळ प्राचीन लेणी स्थापत्यात नव्याने केलेले आहे, हे इथे नमूद करावेसे वाटते. तर लहान उत्खननात एक शिलालेख कोरलेला आहे. लेणे क्रमांक १ पूर्वी, सुरुवातीला दोन नैसगिक गुहा दिसून येतात. त्यांपैकी; एक गुहा तुलनेने काहीशी मोठी असून अंदाजे २० ते २५ फूट लांब आणि १५ फूट रुंद आहे. तेथे उत्खनन करण्याचा प्रयत्न झाला असण्याची शक्यता आहे. कारण; गुहेच्या मुखाशी एक अपूर्ण राहिलेल्या बाकासदृश रचना दिसते. तसेच, आत खोलवर उत्खननाच्या खुणा दिसतात.

या लेणीत एकूण दोन ब्राह्मी-प्राकृत शिलालेख कोरलेले आहेत. यातील पहिला शिलालेख भिक्खूकक्षाच्या उजव्या भिंतीच्या दर्शनी भागावर आहे. तर, दुसरा शिलालेख भिक्खूकक्षाच्या उजव्या बाजूला असणाऱ्या दोन अपूर्ण उत्खननांपैकी एका लहान उत्खननात कोरलेला आहे. शिलालेख क्र. १ हा एक ओळीचा दान शिलालेख असून यात पंधरा-सोळा अक्षरे आहेत. शिलालेखातील अक्षरे खोलवर कोरली नसल्याने सुरुवातीची काही अक्षरे काळानुसार अस्पष्ट आणि खराब झाली आहेत, परंतु शेवटची काही अक्षरे वाचता येतात. शिलालेखातील पहिले अक्षर पूर्णपणे अस्पष्ट आहे. दुसरे अक्षर 'म' असल्याचे दिसते. तिसरे अक्षर 'ल' आहे. त्यापुढील, कदाचित दोन किंवा तीन अक्षरे पूर्णपणे नष्ट झाली आहेत. शेवटची दहा अक्षरे तुलनेने चांगली असून ती पुढील क्रमाने आहेत. 'गि', 'रा', 'नं', 'के', 'झ', 'का', 'नं', 'पु', शेवटून दुसरे अक्षर 'त' आहे तसेच शेवटचे अक्षर 'द' आहे किंवा 'दे' असावे. कारण; पश्चिम महाराष्ट्रातील शिलालेखांमध्ये शेवटी देणगी या अर्थाने सहसा 'दानं' किंवा 'देयधम' या शब्दाचा उल्लेख असतो. या शिलालेखाचा शेवटदेखील 'दानं' किंवा 'देयधम' या शब्दाने करायचा असावा, तथापि; 'द' किंवा 'दे' नंतरचे पुढील अक्षर येथे कोरलेले नाही. यावरून असे समजते की, हा शिलालेख अपूर्ण आहे.

शिलालेखाचे वाचन:_म ल_ गि रा नं के झ का नं पु त द?/दे?

शिलालेखाचे भाषांतर: .. मल .. .. गिरी (पर्वत) येथे राहणाऱ्या केझकाच्या मुलाकडून (देणगी ?)

शिलालेख क्र.२ हा भिक्खू कक्षाच्या उजव्या बाजूला एका लहान उत्खननात कोरलेला आहे. पहिल्या दृष्टीक्षेपात हा एक अपूर्ण शिलालेख दिसतो, ज्यामध्ये एकूण पाच अक्षरे चार अक्षरे व्यवस्थित वाचता येतात. तथापि; पहिल्या दृष्टीक्षेपात पाचवे अक्षर 'रो' असल्याचे दिसते. तथापि; ते 'क' असावे का ? जे योग्यरित्या कोरलेले नाही, असा प्रश्न देखील आहे. लेखक ते 'क' म्हणून वाचतात. त्याच वेळी, लेखकास शंका आहे की 'क' अक्षराला 'र' अक्षर जोडण्याचा प्रयत्न झाला आहे का? जर तसे असेल, तर अपूर्ण उत्खननात कोरलेला हा अपूर्ण शिलालेख व्यक्तीनाम दर्शवितो आणि ते खालीलप्रमाणे आहे.

शिलालेखाचे वाचन: सि ह प भ क र किंवा (रो?)

प्राकृत: सिहपभाक (र?)

संस्कृत: सिंहप्रभाक (र?)

या लेण्यातील पहिल्या शिलालेखात केवळ देणगीदाराचे नाव आणि तो ज्या शहराशी किंवा जागेशी संबंधित आहे त्याचा उल्लेख आहे, परंतु नेमके काय दान केले गेले याचा उल्लेख नाही. तसेच; दुसरा (अपूर्ण) शिलालेख लेणी पूर्ण होण्यापूर्वी कोरलेला आहे, हे सुरुवातीच्या लेणी शिलालेखांचे संकेत आहेत. या दोन्ही शिलालेखांमधील वर्ण सूचित करतात की; ते सातवाहनाच्या सुरुवातीच्या काळात आणि मौर्य काळानंतर लगेचच कोरलेले असावेत. कारण; मौर्य काळातील अक्षरे आयताकृती आहेत, म्हणजे त्यांची रुंदी उंचीपेक्षा कमी आहे. तथापि; सुरुवातीच्या सातवाहन काळात, उंची आणि रुंदीमध्ये हे प्रमाण जवळजवळ समान झाले आहे असे दिसते. हे शिलालेख या दोन्ही वैशिष्ट्यांचे मिश्रण दर्शवितात. शिलालेख क्रमांक १ मधील पहिले अक्षर 'म' अशोकाच्या शैलीची गोलाकार वैशिष्ट्ये दर्शविते. या शिलालेखातील 'ग' हे अक्षर अशोकाच्या सोपारा शिलालेख क्रमांक ९ च्या कोनीय 'ग' च्या तुलनेत वर्तुळाकार आहे. अशोकाच्या सोपारा शिलालेख क्रमांक ९ मधील 'क' हे अक्षर अनियमित वक्र आहे. त्या तुलनेत, या लेणीतील शिलालेखात 'क' हे अक्षर उभ्या आयताकृती स्वरूपात कोरलेले आहे. लेखक दुसऱ्या शिलालेखातील शेवटचे अक्षर 'क' कडे लक्ष वेधतात. ते अक्षर वेगळे आणि वक्र आहे, कदाचित येथील खडबडीत दगडामुळे? ते काहीही असो, परंतु; या लेण्यांमधील शिलालेख पुराभिलेखशास्त्राच्या अभ्यासावर नवीन प्रकाश टाकतात. तसेच; पश्चिम घाटातील लेण्यांचा कालक्रम समजून घेण्यातही ते महत्त्वाची भूमिका बजावतात.

या लेणीस खास बनवणारी गोष्ट म्हणजे भिक्खू कक्षाच्या दर्शनी भिंतींवरील रॉक आर्ट होय. रॉक आर्टमध्ये प्रागैतिहासिक काळापासून ते सुरुवातीच्या ऐतिहासिक काळापर्यंत खडकांवर आणि गुहालेण्यांमध्ये लोकांनी बनवलेली चित्रे आणि शिल्पे समाविष्ट असू शकतात. ऐतिहासिक काळात, लेणी स्थापत्यकलेमध्ये रॉक आर्ट (चित्रे, शिल्पे) मोठ्या प्रमाणात भरभराटीला आलेली दिसून आली आहेत. लेणे क्रमांक १ मध्ये भिक्खू कक्षाच्या दर्शनी भिंतीवर काही प्राणी आणि काही ओळखता न येणारे रॉक आर्ट आहेत, ती कक्षाच्या दाराने विभागलेल्या दोन्ही भिंतींच्या बाह्यबाजूस दिसून येतात. त्यापैकी; उजव्या भिंतीवर शिलालेखाच्या खाली, घोडे, हरण किंवा गाढवे असे चतुष्पाद प्राणी आहेत. या भिंतीवरील प्राण्यांमध्ये, मध्यभागी असलेला प्राणी विशेष आहे. कारण; तो उंचीने ठेंगणा आणि लांबीने जास्त आहे. तसेच; डाव्या भिंतीवर देठासह कमळ आणि काही अंदाज न येणारे खुणा कोरलेल्या आहेत.

लेणी २ ही लेणी मुळात एक नैसर्गिक गुहा असून ती पहिल्या लेणीपासून अंदाजे ७२८ मीटर आग्नेयेस पश्चिमाभिमुख आहे. ज्यामध्ये एक कोरीव पिण्याच्या पाण्याचे टाके (पाणपोढी) आहे. त्याचप्रमाणे, या गुहेत दगडी आसन कोरण्याचा यशस्वी प्रयत्न देखील करण्यात आला आहे. या गुहेच्या मध्यभागी असलेले छत घुमटाच्या आकाराचे आहे आणि घुमटाच्या आकाराच्या छताच्या खाली मूळ खडकाच्या चौकोनी रचना आहेत, ज्या आता भग्न झाल्या आहेत. या घुमटाकृती रचनेची तुलना खारघरमधील पांडवकडा धबधब्याच्या गुहेतील घुमटाकृती रचनेशी करता येईल. पांडवकडा धबधबा नवी मुंबईतील खारघर रेल्वेस्थानकापासून ७ किमी वायव्येस स्थित आहे. पांडवकडा धबधब्याच्या मध्यभागी असलेल्या एका नैसर्गिक गुहेत घुमटाच्या आकाराची रचना दिसते. त्या रचनेवरील छिन्नीच्या खुणा स्पष्टपणे दिसतात. ही रचनादेखील अगदी तशीच आहे. दोन्ही ठिकाणी एकेकाळी दगड, विटा आणि मातीचा स्तूप असण्याची शक्यता आहे, जो कालांतराने नष्ट झाला असावा. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या पांडवकडा धबधब्याच्या उंच कड्यावर अर्धवट कोरीव लेणे आहे. लेखकाने दोन वर्षांपूर्वी या विहार लेण्यास भेट दिली होती. जरी भूगर्भीय वैशिष्ट्ये दर्शवितात की गुहा नैसर्गिक आहे, परंतु गुहेत कोरलेले पाण्याचे टाके, दगडी आसन कोरण्याचा प्रयत्न, गुहेच्या मध्यभागी छताचा घुमटाकृती आकार आणि या घुमटाकृती छताच्या अगदी खाली मूळ खडकाची काटकोनीय रचना हे दर्शविते की; मूळ नैसर्गिक गुहेचे मानवनिर्मित लेणीत रूपांतर करण्याचा प्रयत्न झाला असावा.

या लेण्यांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की; संपूर्ण स्थापत्यकला थेरवाद काळातील असल्याचे सिद्ध होते. हे लेणी स्थापत्य का पूर्ण झाले नाही? येथील खडक चांगल्या दर्जाचा नसल्याने? की यामागे दुसरे काही कारण होते? ते काहीही असो, परंतु; नव्याने आढळलेल्या व तुलनेने अज्ञात असलेल्या या लेण्या, या प्रदेशात आधीच असलेल्या बौद्ध लेण्यांच्या संख्येत भर घालतात आणि महाराष्ट्रातील पश्चिम घाटातील लेणी स्थापत्याचा कालक्रम निश्चिती करण्यास मदत करतात.

संदर्भ:- Bhosale, R. R. (2025). Relatively unknown Rock-Cut caves at Beed Khurd in Khalapur, Raigad. Historicity Research Journal, 11(12), ugust 2025, pp. 31-38.

**रोहित राजेंद्र भोसले**
**लेखक तथा संशोधक**
**भ्रमणध्वनी: ९८९२४००५४६**

# इंजि प्रदीप काळे आदर्श अष्टपैलू व्यक्तिमत्व इंजि. प्रदीप काळे

इंजि. प्रदीप निवृत्तीराव काळे जे अप्पा या नावाने ते सर्वांना सुपरीचीत आहेत. हे नियम वयोमानानुसार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी उपविभागीय जलसंधारण अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्या प्रित्यर्थ दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या गौरवाचा कार्यक्रम लातूर येथील ऑफिसर्स क्लब मध्ये आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे या कार्यक्रमास केवळ त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी उपस्थित नव्हते तर या परिसरातील शेतकरी व त्यांच्या कार्याचे लाभार्थी, मित्रपरिवार आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या विषयी व त्यांच्या कार्याविषयी बोलण्याची एक प्रकारची स्पर्धा येथे लागली होती. प्रत्येक जण आप्पांनी (इंजि. काळे) आपणास कशी मदत केली हे भावनिक होऊन पोटतिडकीने सांगत होते. खरं तर अधिकारी सेवा निवृत्त झाल्यानंतर असे कोणी फारसे बोलत नाही आणि अधिकाऱ्याविषयी तर असे कोणी बोलत नाही जसं इंग्लंडमध्ये तर अशी एक म्हण आहे इंग्लिश पीपल नेव्हर सॅल्यूट टू रिटायर्ड ऑफिसर पण या कार्यक्रमात असं काहीच दिसत नव्हतं. परंतु याप्रसंगी इंजि. काळे यांच्या बहिणी योजना ताई व मुलं तुषार्त, कृतार्थ व मित्रमंडळी आणि कर्मचारी जे बोलले यातून त्यांच्या कामाची कल्पना आली. या कामामागे त्यांच्या आई-वडिलांचे संस्कार सामाजिक जाणीव असलेली दिसून येते. यावरून गोष्ट आठवते दुबईत जगातील एक उंच बुर्ज खलिफा नावाची इमारत १६३ मजली भव्य इमारत आहे. ती पाहण्यासाठी जगातील लोक येतात. ती उंच इमारत बघताना त्यांच्या डोक्यावरची टोपी पडते अशीही इमारत. पण एक दिवस असे झाले की अमेरिकेचा स्टुअर्ट नावाचा माणूस इमारत पाहिला गेला पण त्यांनी वर मान करून इमारत पाहिलीच नाही तेव्हा त्याची पत्नी त्याला म्हणाली तुम्ही इमारत का पाहिली नाही त्यावर तो म्हणाला मी तर अतिशय निरखून पाहिली पण तुम्ही सर्वजण उंच इमारत पहात होता मी खाली पाहत होतो विचार करत होतो, एवढ्या मोठ्या इमारतीचा पाया किती भक्कम असेल, आणि पाया भक्कम आहे म्हणून ही इमारत आहे. हे उदा. यासाठी महत्त्वाचे इंजि. प्रदीप काळे यांचे कार्य निश्चितच भव्य आहे पण त्यांचा पाया त्यांचे आई-वडील व त्याने केलेले संस्कार आहेत. त्यांच्यातील समाजशील भावना आहे. इंजिनीयर प्रदीप काळे यांचे वडील शिक्षक होते. आई नर्स होती. त्यांचे वडील केवळ चार भिंतीच्या शाळेत शिकवणारे शिक्षक किंवा आई केवळ रुग्णालयात सेवा देणाऱ्या नर्स नव्हत्या तर ते एक संस्काराचे केंद्र असावं असं मला वाटतं. आपल्या घरात जन्माला आलेल्या मुलांची नावे दीप-प्रदीप ठेऊन दीप-प्रदीप एकत्रित आणण्याचा मोठा योग त्यांनी आणला.

खरंतर आज इंजिनियर, डॉक्टर यांची संख्या कमी नाही. सवर्ण समाजात तर यांची संख्या असंख्य आहे. पण दलित समाजात डॉ. इंजिनियर, डॉक्टर अधिकारी होण मला खूप महत्त्वाचं वाटतं. कारण दलित मुलं या पदव्या ऐश आरामाच्या प्रवाहात राहून घेत नाहीत. तर त्यांनी प्रवाहाच्या उलट दिशेने जाऊन परिस्थितीशी संघर्ष करीत जातीव्यवस्था, दारिद्र यांच्याशी सामना करीत पदव्या घेतलेल्या असतात. आज बौद्ध असलेले इंजि. काळे यांचा जन्म ही एका दलित कुटुंबात झाला. एक दशकापूर्वी या दलित समाजाचे महाराष्ट्रातील जीवन कसे होते यांची कल्पनाही न केली बरी. तमाम अस्पृश्य समाजाच्या वाट्याला प्रचंड मानहानी, दारिद्र्य, अज्ञान, शोषण, विषमता व आगतिकता आलेली होती. अस्पृश्य माणूस अस्पृश्यतेच्या खोल खाईत लाचारीच, वेठ बिगारीच, अमानवी जीवन, मरणांची वाट बघत बघत जगत होता. अज्ञान आधारांच्या गर्द खाईत गुलामीची जीवन जगत होता. प्रकाशाची याला ओळख नव्हती. कारण या देशात सूर्य तर रोजच उगवत होता पण अस्पृश्यांच्या अंधाऱ्या वस्तीत तो कधी उगवलाच नाही. पण कालांतराने अस्पृश्यांच्या जिवनात एका कधी न मावळणाऱ्या प्रज्ञा सूर्याचा उदय झाला तो प्रज्ञा सूर्य म्हणजे डॉ. आंबेडकर होय. या प्रज्ञा सूर्यामुळे अज्ञानाचा अंधार दूर झाला अस्पृश्य समाज प्रकाशमय झाला आंबेडकरांनी शिक्षणाचा अधिकार नसलेल्या माणसाला शिकण्याचा अधिकार मिळवून दिला, शिका असा संदेश दिला. एवढेच नव्हे तर शिक्षण देण्यासाठी सिद्धार्थ



कॉलेज मिलिंद कॉलेज काढले. वस्तीग्रह काढले. त्यामुळे आजवर शिक्षणाची ओळख न नसणारे शिकू लागले. मोठ्या पदावर गेले अशा असंख्य विद्यार्थ्यां पैकीच इंजिनिअर प्रदीप काळे हे एक आहेत. परंतु प्रदीप काळे केवळ शिकले नाहीत तर ते इंजिनिअर या मोठ्या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत पण याहून महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या कार्यकाळात बाबासाहेबांच्या कल्पनेतील काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कल्पनेतील अधिकारी ठरले. म्हणून मला त्यांच्याबद्दल विशेष आदर वाटतो. कारण आज दलित समाजात इंजिनियर, डॉक्टर, अधिकारी यांचे वाण नाही पण यातील बहुतांशी लोकांना बाबासाहेबांची भावना कळालेली दिसत नाही. डॉ. बाबासाहेब म्हणायचे शिकून मागायच्या जागा मिळवा व त्यांचा फायदा अस्पृश्य समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा पण आम्हाला वाटले मागायच्या जागा म्हणजे पैसे मारण्याच्या जागा म्हणून बाहुतांशी अधिकारी गोरगरीब दलित माणसाकडे लक्ष न देता अमाप माया गोळा करत गेले. सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या श्रीमंतीचा प्रदर्शन करीत राहिले. प्रसिद्धीसाठी आत्मचरित्र लिहून आपणच आपली पाठ थोपटत राहिले. पैशाच्या जोरावर आमदार, खासदार होण्याचे स्वप्न पाहू लागले. पैशातून राजकारण, राजकारणातून पुन्हा पैसा असे गणित मांडू लागले. मला वाटते अशा अधिकाऱ्याकडे फक्त बाबासाहेबांची 'ऋण भावना' त्यांचा विचार सोडून सर्व काही होते. पण अशा अधिकाऱ्याहून अतिशय वेगळं पण मला इंजि. काळे यांच्याकडे असलेले दिसून आले म्हणून त्यांच्याविषयी मला अभिमान वाटणं साहजिक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे असलेल्या मिलिंद कॉलेजमध्ये मी शिकलो त्यावेळी आमचे प्राचार्य चिटणीस होते ते एक गोष्ट आम्हाला सांगायचे ती अशी की एके वर्षी मिलिंद महाविद्यालयाचा निकाल खूप चांगला लागला. अनेक विद्यार्थी मिरीट मध्ये पास झाले. आणि हे बाबासाहेबांना कळावे म्हणून त्यांनी त्यावर्षीच्या गॅदरिंगला बाबासाहेबांना आग्रह करून आणले. खरंतर कॉलेजच्या गॅदरिंग मध्ये कॉलेजची माहिती विद्यार्थी देत असतो पण त्याला नीट सांगता येणार नाही म्हणून स्वतः त्यांनी अहवाल वाचला व कॉलेजमधून मिरीट आलेल्या विद्यार्थ्यांची नावे वाचून दाखवली ते म्हणाले व प्रत्येक नाव वाचत असताना मी बाबासाहेबांकडे पहात होतो पण मला बाबासाहेबांच्या चेहऱ्या वर अपेक्षित आनंद दिसला नाही असं का? असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झाला पण अध्यक्षीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी माझ्या मनातील प्रश्नाला हात घालत म्हणाले चिटणीस मी हे महाविद्यालय अशा प्रकारच्या मिरीट साठी काढले नाही, तर मला यापुढे अशी परमिट लिस्ट दाखवा की, जे मुलं आपल्या कॉलेजमधून शिकून मोठ्या पदावर गेल्यानंतर त्यांनी किती गरीब, दलित, शेतकरी यांची कामे केली? अशा विद्यार्थ्यांची मला लिस्ट द्या. ही बाबासाहेबांची मिरीट लिस्ट विषयीची कल्पना होती. बाबासाहेब आंबेडकरांच्या कल्पनेतील मेरिट लिस्ट मध्ये इंजिनिअर प्रदीप काळे यांचे नाव अगदी वरच्या क्रमावर आहे. त्यामुळे मला त्यांचे अभिनंदन करावे असे वाटते. दुसऱ्याची गोष्ट म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील काम करत असताना त्यांनी आपल्यासमोर इंजिनियर असतानाही सामाजिक दृष्टिकोन ठेवला २०२५ मध्ये केंब्रिज विद्यापीठाचे कुलगुरू निकलोस डक्स याचे सिटी ऑफ इंटेलेक्ट नावाचे आत्मचरित्र आले आहे त्यात ते म्हणतात इंजिनीयर किंवा डॉक्टर यांना समाजशास्त्राचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय त्यांना आपल्या कामाचा फायदा समाजातील गरजू लोकांना देता येणार नाही म्हणून वैद्यकीय इंजिनियर शाखेत समाजशास्त्र हा विषय देखील अनिवार्य असला पाहिजे याचा उल्लेख मी यासाठी करतो आहे की हा सामाजिक दृष्टिकोन इंजिनियर काळे यांच्यात आहे त्यांचा वापर करत त्यांनी काम केल्यामुळे ते अनेक गरजूच्या जवळ गेले व त्यांच्यासाठी काम करू शकले. हे करत करत त्यांनी आपल्या कुटुंबावर असेच संस्कार केले. काळे पती पत्नी दोघेही नोकरीला असून त्यांनी देखील मुलांना शिक्षणाबरोबर चांगले संस्कार दिले आहेत. संस्काराच्या वर्तुळात ठेवूनच त्यांना शिक्षण दिले आहे. त्यांच्या पत्नी डॉ. माया काळे या उच्चशिक्षित आहेत. त्या शाहू कॉलेज च्या माझ्या विद्यार्थिनी होत्या. आज त्या जशा आदर्श माता आहेत. तशाच त्या आदर्श विद्यार्थीनी होत्या. या कुटुंबातील सर्व सदस्यांचे स्वभाव परस्पर पूरक असल्यामुळे या कुटुंबाला आदर्श पर्यंत जाणे शक्य झाले असावे कुटुंबाच्या आणि प्रगतीच्या अनुषंगाने नेहमी असं म्हटलं जातं की यशस्वी पुरुषांच्या मागे एक स्त्री असते किंवा यशस्वी स्त्रीच्या मागे एक पुरुष असतो पण मला वाटतं की जेव्हा पती पत्नी दोघेही परस्परांना समजून घेत मुलावर चांगले संस्कार करतात तेव्हाच एक आदर्श कुटुंब आकाराला येतं. हे कुटुंब आदर्श असल्याचे हेच कारण असावं असं मला वाटतं. शेवटी अशा या आदर्श अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या इंजि. प्रदीप काळे त्यांचे भावी आयुष्य सुखी समाधानी आरोग्यदायी जावो त्यांच्या हातून अशीच सेवा घडो अशी कामना करतो पण सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा देणार नाही, कारण त्याची फक्त नौकारीतील कार्य सेवा संपली आहे. सामाजिक सेवेसाठी आज त्यांच्या सारख्या व्यक्तीची अधिकच गरज आहे. महणून त्यांनी सामाजिक कार्यासाठी आपले योगदान देऊन गरजूंना मदत करण्याचे काम करावे. यासाठी शुभेच्छा देतो व अशीच सेवा त्यांच्या हातून घडावी, अशी तथागत चरणी प्रार्थना करतो.

**डॉ. सुरेश वाघमारे**
**ज्येष्ठ विचारवंत**

## तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वारा येथे ३५० शालेय विद्यार्थ्यांच्या स्वरात दुमदुमली गुरबानी हिंद दी चादर गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम

नांदेड, दिनांक २२ (जिमाका) : हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य साधून, आज पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड येथे एका भव्य आणि विशेष कीर्तन समागमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ३५० शालेय विद्यार्थ्यांनी



एका सुरात केलेले श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या 'शब्द गुरबानी'चे गायन, ज्याने उपस्थित संगतांना मंत्रमुग्ध केले.

पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड बोर्डाद्वारे आयोजित हा कार्यक्रम आज पार पडला. हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे ३५० व्या शहीदी समागम वर्ष निमित्ताने, ३५० विद्यार्थ्यांनी त्यांना ही अनोखी स्वरांजली अर्पण केली.

या कार्यक्रमास तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वाराचे जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघजी, बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ (से. नि.भाप्रसे), हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, जसवंत सिंग बॉबी, गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक हरजीत सिंघ जी कडेवाले आदींची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या गुरबानीच्या पवित्र स्वरांनी संपूर्ण तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब परिसर आणि वातावरण भक्तिमय झाले होते. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी (संगत) मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. शालेय मुलांच्या या शिस्तबद्ध आणि भावपूर्ण सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले.

## शहरात मटका चालऊन अनेकाचे संसार बरबाद करणाऱ्या मटका चालकास बेडया ठोकूण हर्सूल जेलमध्ये केली रावणगी

केज/प्रतिनिधी-केज शहरात मटका चालऊन अनेकाचे संसार बरबाद करणाऱ्या मटका चालकास अखेर बेडया ठोकूण हर्सूल जेलमध्ये रावणगी केली आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की,अनेक वर्ष्या पासुन गणेश सुधीर खराडे वय ३५ वर्षे रा.केज हा केज तालुक्यात कल्याण,मुंबई नावाचा मटका घेत होता अनेक वर्ष्यात त्याच्यवर केज पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल होते. मारामारी करणे धमकावणे अशे १० गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत.

याची दखल घेऊन केजचे पोलीस उपविभागीय अधीक्षक वेंकटराम यांनी गणेश खराडे याच्या विरोधात अहवाल तयार करून तो अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवला गुरुवार रोजी रात्री बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशवरून केज पोलिसानी गणेश खराडे च्या मुसक्या आवळून त्यास बीड पोलिस एल.सी.बी.ह च्या ताब्यात दिले, त्यांनी गणेश खराडे यास हर्सूल जेल मध्ये पाठवण्यात आले आहे गणेश खराडे यास जेल मध्ये पाठवल्या मुळे केज तालुक्यातील

गुन्हेगारीला आळा बसेल अनेक दिवसांपासुन खराडे यास अटक करण्याची नागरिकांची मागणी होती ती आज पूर्ण झाली आहे अशा चर्चा नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहेत. सदर कारवाईमुळे अवैद्य धंदे करणाऱ्याला यापुढे लगाम लागेल व सर्वसाधारण नागरिकांना दिलासा मिळेल असे नागरिकांतून बोलले जात आहे.

# अनाधिकृतपणे अंगणवाडी पाडणाऱ्या माथेफिरु विरुद्ध कारवाई करण्यात यावी अन्यथा आमरण उपोषण करणार-आश्रुबा खरात

केज/प्रतिनिधीकेज तालुक्यातील जीवाचीवाडी- तूकुचीवाडी- रानोबाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत रानोबाचीवाडी येथील अंगणवाडी अनाधिकृतपणे कोणतेही कायदेशीर परवानगी न घेता एका माथेफिरूनी पाडल्यामुळे त्याच्यावर शासकीय मालमत्तेचे नुकसान व कायद्याचा भंग केल्यानुसार तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे केज तालुकाध्यक्ष आश्रुबा खरात यांनी केज पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. जर संबंधितावर गुन्हे दाखल न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला खरात यांनी दिला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील रानोबाचीवाडी येथील अंगणवाडी ही मागील ३० वर्षापासून गावातील लोकांनी लोकवर्गणीतून चालू केलेले होते. सदरील इमारतीचे काम हे सन २०२४-२५ या वर्षी वित्त आयोगातून १ लाख ५० हजार रुपये खर्च करून डागडुगीचे काम हे जीवाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतच्या माध्यमातून करण्यात आलेले होते.



परंतु एका माथेफिरू व्यक्तीने मागील आठ दिवसापूर्वी कोणतीही परवानगी न घेता त्या अंगणवाडीची इमारत जमिनीधोस्त केलेली आहे. गावातील लोक हे सर्वसामान्य ऊसतोड मजूर आहेत, आज रोजी त्यांचे पाल्य हे उघड्यावर शाळेत बसलेले आहेत.

सदरील बाब ही आमच्या पक्षाच्या संपर्क कार्यालयात तक्रारीच्या माध्यमातून आलेले आहे.

तरी आठ दिवसांच्या आत त्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्या व्यक्तीस कायद्याचा व प्रशासनाचा धाक द्यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. जर प्रशासनाने संबंधितावर आठ दिवसांमध्ये कारवाई न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा प्रशासनाला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी,पंचायत समिती केज, पालकमंत्री बीड, जिल्हा अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई, तहसीलदार केज, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिले आहेत.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे केस तालुकाध्यक्ष आशीर्वाद खरात यांनी सांगितले की, दिनांक १९ जानेवारी रोजी गट विकास अधिकारी,पंचायत समिती केज यांना निवेदन दिले असताना अद्यापही असल्यास प्रकारची कारवाई केली नाही म्हणून पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत अपवाय बशीर यांच्या नेतृत्वाखाली लवकरच आम्ही पक्षाचे पदाधिकारी व ग्रामस्थांना घेऊन पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करणार आहोत.राणोबाचीवाडी येथील ग्रामस्थांनी मिळून लोकवर्गणी जमा करून सदर अंगणवाडी चे बांधकाम केले होते. नंतर मागील एक ते दीड वर्षांपूर्वी ग्रामपंचायत च्या माध्यमातून शासनाने सदर अंगणवाडीच्या दुरुस्तीच्या कामासाठी १ लाख ५० हजार रुपये निधी दिला होता परंतु यामध्ये अंगणवाडीच्या खोली वर लोखंडी पत्रे टाकण्यात आले होते. या अंगणवाडीच्या खोलीची फरशी, खिडक्या, दरवाजे याची दुरुस्ती अथवा बदलण्यात आलेले नव्हते. अशा प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या आहेत.

रानोबाचेवाडी येथील अंगणवाडी इमारत (खोली) पाडण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाचा ठराव घेतलेला नाही. -ग्राम विकास अधिकारी महेंद्र मुंडे रानोबाचीवाडी येथील अंगणवाडी ची इमारत पाडल्याप्रकरणी पंचायत विभागाकडे अद्यापही तक्रारी अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच सदर अंगणवाडीची खोली पाडण्यासाठीचा ठराव हा पंचायत विभागाला मिळालेला नाही. सदर प्रकरणी ग्रामविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येईल व संबंधितावर योग्य ती अशी कार्यवाही करण्यात येईल.

व्ही.आर. मस्के विस्तार अधिकारी, पंचायत विभाग, पंचायत समिती केज-सदर प्रकरणाची माहिती घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधींनी गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या मो.नं.९४०५२३२५२५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आमच्या प्रतिनिधीचा फोन न घेतल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.

